ठाकरे बंधूंची युती पक्की, मनपा निवडणुकीत महाविकास आघाडी नाही; खासदार संजय राऊतांचं सूचक विधान >> पान 2

दादा, कुत्री उड्या मारतात, डिवायडर मोठे करा, तक्रार ऐकून अजित पवारांनी डोक्यावर हात मारलां, आजपर्यंतचं सर्वात धमाल भाषण >> पान 3

"रुग्ण सेवा हिच, ईश्वर सेवा" मेहकर येथे आरोग्यरथाचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते लोकार्पण >> पान 4

**सुविचार**

कष्टाला कधीच पर्याय नाही.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 80 ■ रविवार, दि. 19 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटातील अभिनेत्री झायरा वसीमचा झाला निकाह, फोटो शेअर करुन केला आनंद व्यक्त... आतील पान

# जिल्हाधिकाऱ्यांना मतदार यादीत घोळ तपासण्याचे आदेश

## महाविकास आघाडी आणि मनसेच्या प्रयत्नांना यश

**मुंबई : महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सलग दोन दिवस निवडणूक आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केल्यानंतर अखेर निवडणूक आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना मतदार यादीमधील घोळ तपासण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीसह मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या मागणीला मोठे यश आलं आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यामध्ये मतदारयादीमधील घोळ समोर येत आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहिल्यांदा मतदारयादीमधील घोळ समोर आणताना वारंवार महाराष्ट्र आणि कर्नाटकचा उल्लेख केला आहे.**



या सर्व पार्श्र्वभूमीवर महाविकास आघाडीसह मनसे नेत्यांनी राज्य निवडणूक आयोगासह आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींची भेट घेतली होती. एकाच कुटुंबामध्ये शेकडो नावे नोंदवल्याचे दाखवून दिले होते. त्यामुळे मनसेकडून तसेच महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्र्नांवर आयोगाचे अधिकारी निरुत्तर झाल्याचे दिसून आले होते.

आता या सर्व पार्श्र्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त चोक्कलिंगम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना मतदारयादींच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. एकाच मतदारसंघामध्ये या महिलेचे दोन ठिकाणी नावे कशी आली, याबाबत चौकशी केली जाईल. यामध्ये जे अधिकारी दोषी आढळतील, त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. दिवाळी असल्यामुळे कदाचित पुढील आठवड्यात हा संपूर्ण अहवाल येण्याची शक्यता आहे. हा अहवाल आल्यानंतर आरोप केलेल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांना त्याची प्रत दिली जाईल.

विरोधकांनी नागपूरमध्ये एकाच घराच्या पत्त्यावर २०० मतदार असल्याचा गंभीर आरोप केला होता. चौकशीनंतर समोर आले आहे की हे मतदार झोपडपट्टी परिसरातील आहेत. जयश्री मेहता या महिलेचे दहिसर आणि चारकोपसह एकूण चार ठिकाणी मतदान असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. मोहन नंदा बिलवा या महिलेचे नाव मतदार यादीत तीन ठिकाणी आढळले असल्याचा आरोप करण्यात आला होता. आता राज्यातील विरोधकांनी आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर जी मागणी केली होती त्याला मोठं यश आलं आहे. जोपर्यंत सदोष यादी आहे तोपर्यंत निवडणुकाच घेऊ नका, गेल्या पाच वर्षांपासून निवडणुका थांबवल्या आहेत, तर आणखी सहा महिने निवडणुका पुढे गेल्यास काय फरक पडतो, अशी विचारणा करत उद्धव ठाकरे तसेच राज ठाकरे यांनी निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी केली होती. राष्ट्रवादीचे जयंत पाटील, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सुद्धा आम्ही या संदर्भात आवाज उठवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे म्हटले होते. राज ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीमधील शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात, शेकापचे जयंत पाटील, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांनी निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन मोठे आरोप केले होते आणि पुरावेही सादर केले होते.

**राज ठाकरेंकडून कोणती मागणी करण्यात आली?**

निवडणूक आयोग केवळ निवडणूक घेतात आणि राजकीय पक्ष निवडणूका लढवतात, मग राजकीय पक्षांना जर निवडणूक आयोग मतदार याद्या दाखवत नसेल तर पहिला घोळ इथे आहे

२०२४ साली ज्या निवडणुका झाल्या त्याआधीच्या यादीत मुलांच्या वयापेक्षा वडिलांचे वय कमी कसे?

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतरच्या मतदारयादीत अनेक मतदारांची नावं आहेत मात्र फोटो नाहीत.

राज्य निवडणूक आयेगाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यावर त्यांनी याची जबाबदारी केंद्रीय निवडणूक आयोगावर ढकलली

जोपर्यंत मतदार याद्यांमध्ये पूर्णपणे सुधारणा होत नाही तोपर्यंत निवडणूका घेऊ नका अशी मागणी आम्ही निवडणुक आयोगाकडे केली आहे.

जेव्हा खोट्या यादीची बातमी माध्यमांवर येते नंतर संबंधित नावं मतदार यादीतून गायब होतात त्याबद्दल निवडणूक आयोगाला माहिती नाही. जी नावं निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरून गायब झाली त्याची माहिती आयोगाकडे नसेल तर ती नावं कोण काढतंय आणि नवी नावं कोण टाकतंय याचा तपास करावा लागेल

आपण कोणाला मतदान करतो हे गोपनिय असतं, मतदार कसे गोपनीय असतील? मतदान केंद्रावर लावलेल्या सीसीटीव्हीचे फुटेज निवडणूक आयोग बघू शकतं मग आम्ही का नाही बघू शकत?

२०२२ च्या यादीत जाहीर केलेल्या यादीमध्ये मतदारांचे फोटो आहेत, मग आत्ता जाहीर केलेल्या यादीतून मतदारांचे फोटो का काढून टाकले? हा घोळ निवडणूक आयोग का करतंय?

## नाशिकच्या कारागृहात कैद्यांची अंमली पार्टी, 'तो' व्हायरल व्हिडीओ मागील वर्षाचा; पोलिसांकडून मोठी माहिती

**नाशिक :** नाशिकरोड येथील मध्यवर्ती कारागृह पुन्हा एकदा गंभीर वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. कारागृहातील काही कैद्यांनी सुरक्षेचा फज्जा उडवत अंमली पदार्थांचे सेवन करतानाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. विशेष म्हणजे या व्हिडीओंमध्ये मातीच्या चिलीमचा वापर करत अमली पदार्थ ओढताना दिसणारे दृश्य, तसेच कैद्यांकडून मोबाईल फोनवर शूट केलेल्या रील्स व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकाराची दखल घेत नाशिकरोड पोलिसांनी ५ ते ६ कैद्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस तपासात हे व्हिडीओ मागील वर्षीचे असल्याचे निष्पन्न झाले असून, तरीही इतक्या गंभीर प्रकारानंतरही कारागृह प्रशासनाकडून वर्षभरात कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, हे विशेष लक्ष वेधणारे आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. कारागृह प्रशासनाने या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, ''हे व्हिडीओ जुने असून, काही आत्मसंतुष्ट लोकांनी ते मुद्दाम व्हायरल केले आहेत. कैद्यांच्या सुधारासाठी गेल्या काही वर्षांपासून सकारात्मक उपक्रम राबवले जात आहेत,'' असा दावा करण्यात आला. मात्र सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओंमध्ये मोबाईलचा सर्रास वापर, आणि अमली पदार्थांचे खुले सेवन पाहून या दाव्यांवर शंका उपस्थित केली जात आहे.

## ग्राहकांना मोठा दिलासा! धनत्रयोदशीला सोने झाले स्वस्त, चांदीचे भाव 10 हजारांनी घसरले

**मुंबई :** आजपासून दिवाळीला सुरुवात झाली आहे. आज धनत्रयोदशी असून या दिवशी सोने खरेदी करणे शुभ मानले जाते. आजच्याच दिवशी ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सोनं आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. त्यामुळं आजच्या सणासुदीच्या दिवसांत ग्राहक सोने-चांदीचे दागिने खरेदी करु शकणार आहेत. धनत्रयोदशीच्या दिवशी ग्राहक सोने-चांदीत गुंतवणुक करू शकणार आहात.

धनत्रयोदशीच्या आधीच गुंतवणुकदार आणि ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. चांदीच्या दरात रेकॉर्डब्रेक तेजी गेल्या काही दिवसांपूर्वी दिसून आली होती. मात्र आता चांदीचे दर १०,००० रुपयांपर्यंत खाली घसरले आहेत. श्ळें वर आज चांदीने १,७०,४१५ रुपये प्रति किलोग्रॅमवर उच्चांकी दर नोंदवला होता. त्यानंतर यात मोठी घट दिसून आली. सोन्याचे दरदेखील साधारण ४००० रुपयांपर्यंत खाली घसरली आहे. अचानक झालेल्या घसरणीनंतर सराफा बाजारात एकच खळबळ उडाली आहे. ग्राहकांना खरेदीसाठीची एक संधी मिळाली आहे. आज श्ळें वर सोनं १,३०,८६० रुपयांवर पोहोचले आहे.


## डिलिव्हरी बॉयला मिळाला रक्ताने उशीवर लिहलेला गुप्त संदेश

**मुंबई :** चीनमध्ये १९ वर्षीय डिलिव्हरी बॉय झांग कुनने आपल्या हुशारीने ३० तासांपासून खोलीत अडकलेल्या एका महिलेला वाचवले. फुटपाथवर पडलेल्या तकियावर रक्ताने लिहिलेला गूढ संदेश पाहून त्याने तत्काळ पोलिसांना माहिती दिली. झांग आणि पोलिसांनी तो संदेश डिकोड केल्यानंतर समजले की हा प्रकार जवळच्या इमारतीच्या २५व्या मजल्यावरील एका होमस्टेशी संबंधित आहे. झांग कुन चीनमध्ये डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो आणि त्याच वेळी विद्यार्थीही आहे. एका दिवशी डिलिव्हरी करत असताना त्याला रस्त्याच्या कडेला एक पांढरी उशी दिसली, ज्यावर रक्ताने ''११०'' आणि ''६२५'' असे आकडे लिहिलेले होते. त्याने तात्काळ पोलिसांना कळवले. पोलिसांनी तपास सुरू केला आणि लक्षात आले की हा तकिया जवळच्या इमारतीच्या २५व्या मजल्यावरून खाली पडलेला आहे. पोलिसांना सुरुवातीला वाटले की कोणत्यातरी महिलेवर हल्ला झाला आहे, पण जेव्हा त्यांनी खोली उघडली तेव्हा लक्षात आले की ती महिला आत अडकली होती. दरवाज्याचे लॉक अचानक बिघडल्याने ती बाहेर पडू शकली नव्हती. तिच्याकडे मोबाईल फोनही नव्हता आणि ती ३० तासांपासून मदतीसाठी हाका मारत होती, पण कुणीही ऐकले नव्हते. शेवटी तिने बोटाला जखम करून रक्ताने तकियावर आपत्कालीन क्रमांक लिहिला आणि तो खिडकीतून खाली फेकला.

# जालन्यातील लाचखोर आयुक्तास कोर्टाचा दणका

## जामीन फेटाळला; तुरुंगातील मुक्काम वाढला

**जालना/प्रतिनिधी :** महापालिका आयुक्तांना चक्क १० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. आता, जालन्यातील महानगरपालिकेचे लाचखोर आयुक्त संतोष खांडेकर याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून न्यायालयाकडे जामीनासाठी केलेला अर्ज कोर्टाने फेटाळून लावला आहे. त्यामुळे, जालना महापालिका आयुक्त महोदयांचा कोठडीतील मुक्काम आणखी वाढला आहे. एका कंत्राटदाराकडून १० लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी महपालिका आयुक्तांना एसीबीने अटक केली होती. त्यानंतर, त्यांना न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आले होते.




दोन दिवसापूर्वी कंत्राटदाराकडून १० लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी जालना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडून आयुक्त खांडेकरला अटक केली होती. या प्रकरणी आरोपी खांडेकरला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती, आज अंबड येथील सत्र न्यायालयाने खांडेकरची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. दरम्यान, आयुक्त महाशयांनी तात्काळ आपला जामीनासाठी अर्ज केला होता. मात्र, अंबड न्यायालयाने आरोपी लाचखोर आयुक्तांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर लाचेच्या जाळ्यात अडकले आहेत. तक्रारदाराकडून कामाचे बिल पास करण्यासाठी तब्बल १० लाख रुपयांची लाच देण्याची मागणी खांडेकर यांनी केली होती. यावेळी शासकीय निवासस्थानी १० लाखांची लाच स्वीकारताना रंगेहाथ त्यांना पकडले होते. जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं ही कारवाई केली. संतोष खांडेकर यांच्या घराची देखील झाडाझडती घेण्यात आली आहे. या घटनेनं जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या अटकेनंतर जालन्यात कंत्राटदारांनी जालना एसीबी कार्यालयाबाहेर फटाके फोडून आपला रोष व्यक्त केला.

# दस्त नोंदणीबाबत महसूल विभागाचा मोठा निर्णय!

## १८६५ पासूनच्या जुन्या दस्तांचे संवर्धन केले जाणार

**पुणे/प्रतिनिधी :** राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत जुन्या ऐतिहासिक दस्तांच्या डिजिटायझेशनला मंजुरी दिली आहे. १८६५ ते २००१ या काळात तयार झालेले दस्त, फिल्म आणि मायक्रोफिल्म या सर्वांचा समावेश या उपक्रमात करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी सरकारने ६२ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेची घोषणा केली असून, राज्यभरातील ३० कोटींहून अधिक दस्तऐवजांचे डिजिटल स्वरूपात जतन केले जाणार आहे.

या दस्तांचे डिजिटायझेशन झाल्यानंतर ते ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येतील आणि नुकतीच सुरू झालेली 'ई-प्रमाण' प्रणालीशी त्यांची जोडणी केली जाणार आहे. या माध्यमातून प्रत्येक दस्ताला डिजिटल स्वाक्षरीसह प्रमाणित प्रवेश मिळेल. त्यामुळे हे दस्त कायदेशीर दृष्ट्या वैध ठरणार असून, कायदेशीर वाद मिटविण्यास मोठा हातभार लागणार आहे.

नोंदणी आणि मुद्रांक विभागाच्या माहितीनुसार, १८६५ ते २००१ या काळात दस्तांची नोंदणी पारंपरिक पद्धतीने करण्यात येत होती. तर १९२७ ते २००१ या काळात या दस्तांच्या फोटो फिल्म्स तयार करून जतन करण्यात आल्या. सध्या राज्यात ५१७ दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये या सर्व जुन्या नोंदी ठेवलेल्या आहेत. कालांतराने अनेक दस्तांवर बुरशी लागल्याने आणि फिल्म खराब झाल्याने त्यांचे संवर्धन आणि पुनर्रचयनाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

या पार्श्वभूमीवर, नोंदणी मुद्रांक विभागाने या नोंदींच्या जतनासाठी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये जुन्या फिल्म्सना रासायनिक प्रक्रियेच्या माध्यमातून विकसित करून त्यांचे डिजिटल स्वरूपात रूपांतर करण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, राज्यातील सर्व जुने दस्त आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होतील.

नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने अलीकडेच सुरू केलेल्या 'ई-प्रमाण' प्रणाली अंतर्गत जुने दस्त आता डिजिटल स्वाक्षरीसह उपलब्ध आहेत. त्यामुळे हे दस्त न्यायालयीन प्रकरणे, सरकारी व्यवहार आणि इतर कायदेशीर बाबींमध्ये अधिकृत पुरावा म्हणून वापरता येतील. यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले अनेक मालमत्ता वाद संपुष्टात येण्यास मदत होईल.

नोंदणी उपमहानिरीक्षक अभयसिंह मोहिते यांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे जुने व्यवहार आणि मालमत्तेशी संबंधित दस्त सहज उपलब्ध होतील. परिणामी, नागरिकांना नोंदी शोधण्यासाठी सरकारी कार्यालयांची पायपीट करण्याची गरज उरणार नाही. तसेच सर्व माहिती ऑनलाइन आणि पारदर्शक स्वरूपात उपलब्ध होणार असल्याने भ्रष्टाचारालाही आळा बसेल.राज्य सरकारचा उद्देश पुढील काही वर्षांत सर्व जुन्या दस्तांना पूर्णत: डिजिटल स्वरूपात आणण्याचा आहे. त्यामुळे हे दस्त केवळ जतनच नव्हे तर भावी पिढ्यांसाठी उपलब्ध वारसा म्हणून टिकून राहतील.

# पिकअप वाहनाच्या अपघातात ८ भाविकांचा जागीच मृत्यू

## नंदूरबार जिल्ह्यातील घटना; वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले

**दैनिक आपला विदर्भ**

नंदूरबार : नंदूरबार जिल्ह्यातील चांदशैली घाटात शनिवारी एक भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी आहेत. यापैकी काही जणांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. प्राथमिक माहितीनुसार, येथील चांदशैली घाटात पिकअप गाडी उलटून हा अपघात झाला. या गाडीतील लोक अस्तंबा यात्रेसाठी गेले होते. ही यात्रा संपवून माघारी परतत असताना काळाने या भाविकांवर घाला घातला. चांदशैली घाटातून पिकअप गाडी जात असताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि मोठा अपघात झाला.

प्राथमिक माहितीनुसार, आतापर्यंत या अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. यापैकी १० जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. त्यामुळे दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढण्याची दाट शक्यता आहे. सध्या या सर्वांना तळोदा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले जात आहे. या अपघातानंतर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्याकडून तातडीने बचावकार्य हाती घेण्यात आले. पोलिसांनी जखमींना पिकअप व्हॅनमधून बाहेर काढून उपचारासाठी रवाना केले.

पिकअप व्हॅन घाटात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि गाडी पलटी झाली. त्यामुळे वाहनाच्या मागच्या भागात बसलेले लोक खाली दबले गेले. अनेकांना जबर मार लागला. त्यामुळे त्यांचा जागीच



मृत्यू झाला. पोलीस बचाकार्यासाठी घटनास्थळी आले तेव्हा येथील दृश्य भयावह होते. अनेक लोक जखमी अवस्थेत रस्त्यावर पडून होते. यापैकी अनेकजण गंभीर जखमी दिसत होते. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची दाट शक्यता आहे.

**समृद्धी महामार्गावर इनोव्हा कारचा भीषण अपघात; म्यानमारच्या २ जणांचा जागीच मृत्यू**

समृद्धी महामार्गावर इनोव्हा कारचा भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. या भीषण अपघातात म्यानमारच्या दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर मुंबईवरून नागपूरकडे जाणाऱ्या वाशिमच्या मालेगाव ते जऊळका दरम्यान कॉरिडरवर क्रमांक २३२ वर हा अपघात झाला आहे. इनोव्हा गाडीच्या वाहन चालकाला डुलकी लागल्यामुळे हा भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये २ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

>> पान २

## दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच!

आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधून सुरू आहे. आकाशकंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हंटले की गोडाआधोडाचा फराळ, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही समीकरण आहे. दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकाची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. महाराष्ट्रात पहिला दिवाळी अंक १९०९ साली प्रसिद्ध झाला होता. त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११६ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरील दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या आसपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दरवर्षी त्यात नव्या अंकाची भर पडतेच. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, साहित्य, राजकारण, अर्थकारण, विनोद, कथा, कादंबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य, चित्रपट, नाटक अशा विविध विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणजे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. यावर्षीही अनेक वृत्तपत्रांनी आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढले आहेत. फटाके, मिठाई, फराळ यासोबतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे.

मधल्या काळात दिवाळी अंकांना घरघर लागली होती. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाई आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाले होते. असे असली तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाईन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते डिजिटल प्लॅटफॉर्म वर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते. कोरोनाचे दुष्चक्र संपल्यानंतर दिवाळी अंकांना पुन्हा सुगीचे दिवस आले. यावर्षी अनेक संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. काहींनी ऑडिओ आणि व्हिज्युअल दिवाळी अंकही बाजारात आणले आहेत. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे. दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात आणि नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यात दिवाळी अंकांचा मोलाचा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या नातेवाईकांना आणि मित्र परिवाराला दिवाळीच्या शुभेच्छा आणि फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावीत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाच्या फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती टिकायलाही मदत होईल.

# ठाकरे बंधूंची युती पक्की, मनपा निवडणुकीत महाविकास आघाडी नाही; खासदार संजय राऊतांचं सूचक विधान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी** : राज ठाकरे महाविकास आघाडीत जाणार का, अशा चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहेत. शिवसेना (उबाठा) खासदार संजय राऊत यांनी याबाबत सूचक वक्तव्य केलं असून, मनपा निवडणुकीत महाविकास आघाडीबाबत चर्चा नसल्याचं स्पष्ट केलं आहे. मनसे आणि शिवसेना (उबाठा) ठाणे आणि मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी एकत्र लढणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

मुंबई, ठाण्यात एकत्र लढणार : संजय राऊत म्हणाले, ''राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले आहेत. ज्यांना आमच्यासोबत यायचे आहे, त्यांचे स्वागत आहे ही युती पक्की आहे. मुंबई आणि मराठी माणूस वाचवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आहेत. दोन ठाकरे सबपे भारी. ठाण्यात आमचा नारा आहे ७५ पार! दोन ठाकऱ्यांनी ठरवलं, तर मुंबईचे रस्ते बंद होतील.'' ठाण्यात मनसे-शिवसेना एकत्र लढणार असून, हा मराठी ऐक्याचा दीपोत्सव असल्याचं त्यांनी नमूद केलंय. यापुढे मराठी माणसांच्या प्रत्येक प्रश्नासाठी राज आणि उद्धव ठाकरे एकत्र काम करणार आहेत. राऊत यांनी स्पष्ट केले की, इंडिया आघाडी लोकसभेसाठी होती, तर महाविकास आघाडी विधानसभेसाठी तयार झाली होती. मात्र, मनपा निवडणुकीसाठी अशी कोणतीही चर्चा झालेली नाही. मनसेचा महाविकास आघाडीत समावेश करण्याबाबत अद्याप कोणताही अधिकृत प्रस्ताव आलेला नाही.

भाजपाचा रंग आता भ्रष्टाचाराचा झालाय : पत्रकार परिषदेत राऊत यांनी भाजपा, मंत्री आशिष शेलार, छगन भुजबळ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. भाजपाच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करत ते म्हणाले, ''भाजपामध्ये ९० टक्के नेते काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून आलेले आहेत. स्वत:ची पोरं जन्माला घाला, दुसऱ्यांची पोरं किती वेळ खेळवणार? भाजपाचा रंग आता भ्रष्टाचाराचा झाला आहे.'' आशिष शेलार यांच्या ठाकरे बंधूंवरील हिंदुत्वाच्या टीकेला प्रत्युत्तर देत संजय राऊत म्हणाले, ''शेलारांनी राज ठाकरेंकडे चहा प्यायला जाऊ नये, उगाच नाटक करू नये. ठाकऱ्यांचा रंग पक्का आहे, तो खरवडून काढण्याचा प्रयत्न करू नका. भाजपाचा रंग भ्रष्टाचाराचा आहे.''

भुजबळ आणि फडणवीसांवरही निशाणा : छगन भुजबळ यांच्यावर टीका करताना राऊत म्हणाले, ''भुजबळांना अजित पवार किंवा देवेंद्र फडणवीसांनी मंत्री केलेले नाही, तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले आहे. त्यांचे जातीय राजकारण आहे. विखे पाटील यांच्यावर टीका करताना ते मुख्यमंत्र्यांना आव्हान देत आहेत. एक तर तुम्ही राजकीय गुंड आहात हे जाहीर करा, नाही तर मुख्यमंत्र्यांचे आदेश पाळा.'' मुख्यमंत्री फडणवीसांवर भ्रष्टाचाराचे आरोप करत राऊत म्हणाले, ''मिस्टर फडणवीस साहेब, तुम्ही भ्रष्टाचाराच्या चिखलात डुबक्या मारताय आणि आम्हाला ज्ञान देत आहात. राजकारण करताना तुम्ही जपून करा, कारण आम्ही तुमच्या आधीपासून महाराष्ट्राच्या रस्त्यावर राजकारणात आहोत. मुंबई, पुणे, ठाणे तुम्ही कुणाच्या हाती देणार आहात. पुण्याच्या जैन समाजाच्या



जागेचे प्रकरणात सर्व बाहेरचे लोक आहेत. या साडेतीन ते ४ हजार कोटी रुपयांच्या प्रकरणाचे धागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत गेले आहेत. हे लवकरच मी बाहेर काढणार आहे. जाती जातींमध्ये वाद लावण्याचे काम मुख्य मुद्द्यावरून बाजूला करण्यासाठी सुरू आहे. ही पेशवाई सुरू आहे'', अशी टीका संजय राऊतांनी केली.

शरद पवार महाराष्ट्राची अस्मिता : संजय राऊत म्हणाले, ''शरद पवार हे महाराष्ट्राची अस्मिता आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईमध्ये काँग्रेसचे अनेक नेते होते. आताही तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. एका उद्योगपतीकडून मुंबई गिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. प्रत्येक मराठी नेत्यांची जबाबदारी आहे की, मुंबई कुणाच्या घशात जाऊ द्यायची नाही. या लढाईसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पुढारी कुठेही मागे राहणार नाहीत.''

## आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटातील अभिनेत्री झायरा वसीमचा झाला निकाह, फोटो शेअर करून केला आनंद व्यक्त...

**मुंबई /प्रतिनिधी** : 'दंगल' फेम माजी अभिनेत्री झायरा वसीमचा आता निकाह झाला आहे. २०१९ मध्ये झायरा चित्रपटसृष्टी सोडून गेली होती. ती चित्रपटसृष्टीपासून दूर एकाकी जीवन जगत होती. आता तिनं तिच्या लग्नाचे फोटो शेअर करून तिच्या चाहत्यांना आश्चर्यचकित केलं आहे. झायरानं तिच्या पतीबरोबरचे सुंदर फोटो शेअर केले आहेत. झायरानं तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर निकाहमधील फोटो शेअर करत अभिनंदन व्यक्त केला आहे. झायरानं लग्नाच्या फोटोंमध्ये तिचा किंवा तिच्या पतीचा चेहरा दाखवला नाही, मात्र ती निकाहच्या प्रमाणपत्रावर सही करताना दिसत आहेत.

झायरा वसीमचा झाला निकाह : झायरा आणि तिच्या पतीचे व्हायरल झालेले फोटोंना सोशल मीडियावर असंख्य लाईक्स मिळवत आहेत. या फोटोंवर प्रतिक्रिया देऊन अनेकजण तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत. दरम्यान शेअर केलेल्या फोटोंमध्ये झायराचे सुंदर मेंदी लावलेले हात आणि तिच्या लग्नाची अंगठी दिसत आहे. दुसऱ्या फोटोमध्ये झायरा तिच्या पतीबरोबर बसली असून ती कॅमेऱ्याकडे पाठ करून आहे. आता झायरानं तिचे नवीन आयुष्य सुरू केले आहे. एका चाहत्यानं तिच्या पोस्टवर लिहिलं आहे, 'निकाह मुबारक चुऊ बहना.' दुसऱ्या एकानं लिहिलं आहे, 'तुम्हा दोघांचेही अभिनंदन.' आणखी एकानं लिहिलं, 'तुमच्या दोघांना पण खूप खूप प्रेम अभिनंदन.' याशिवाय अनेकजण या पोस्टवर हॉर्ट इमोजी देऊन प्रेमाचा वर्षाव करत आहेत.

झायरा वसीमबद्दल : दरम्यान झायरानं २०१६ मध्ये आलेल्या आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटात आमिर खानची मुलगी कुस्तीगीर गीता फोगटची भूमिका साकारली होती. 'दंगल' हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटासाठी तिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २०१७ मध्ये, झायरानं पुन्हा एकदा आमिर खानबरोबर धमाल केली. आमिरनं तिला त्याच्या 'सिक्रेट सुपरस्टार' चित्रपटात घेतलं, या चित्रपटानं देखील खूप कमाई केली. २०१९ मध्ये, झायरानं सोशल मीडियावर चित्रपटसृष्टीतून बाहेर पडण्याची घोषणा करून तिच्या चाहत्यांना एक आश्चर्यचा धक्का दिला. आता ती साधारण आयुष्य जगत आहे.

# अंध:कारातून प्रकाशाकडे : अंधश्रद्धा निर्मूलनाचा समाजशास्त्रीय प्रवास

अंधश्रद्धा ही केवळ वैयक्तिक श्रद्धेची किंवा धार्मिक भावनेची बाब नाही; ती आपल्या समाजाच्या संरचनेत, संस्कृतीत आणि सत्तासंबंधांमध्ये खोलवर रुजलेली सामाजिक वास्तवता आहे. भारतीय समाजशास्त्रीय जीवनाचा अभ्यास केल्यास दिसते की श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांचा परस्परसंबंध हा मानवाच्या सामाजिक व मानसिक गरजांशी निगडित आहे. श्रद्धा व्यक्तीला आधार देते, आशा देते, पण विवेकशून्य श्रद्धा म्हणजेच अंधश्रद्धा समाजाला अंधारात ढकलते. इमाईल दुर्खीमच्या 'सामूहिक चेतना' या संकल्पनेप्रमाणे समाजातील विश्वास प्रणाली ही एकात्मतेचे साधन असते; परंतु जेव्हा ही चेतना अज्ञान, भीती आणि सत्तेच्या रचनेशी गुंतते, तेव्हा ती दमनाचे साधन बनते.

भारतीय समाजात अंधश्रद्धेचा इतिहास प्राचीन धार्मिक संस्कृतीशी जोडलेला आहे. ग्रहदोष, अपशकुन, शुद्ध-अशुद्धतेचे निकष, जातिव्यवस्था, स्त्रीविषयक बंधने या सर्वांनी समाजात रूढ झालेल्या श्रद्धांना 'दैवी सत्य' म्हणून मान्यता दिली. काळ जसजसा पुढे गेला तसतसे विवेक व तर्क यांची जागा अंधश्रद्धेने घेतली. समाजात स्त्रियांवर झालेली अन्यायपूर्ण बंधने, मासिक पाळीशी निगडित अपवित्रतेचे समज, विधवांना समाजातून बहिष्कृत करणे, 'डायन' ठरवून महिलांवर अत्याचार करणे या सर्व घटना समाजाच्या सांस्कृतिक अधोगतीचे द्योतक ठरल्या. या अंधश्रद्धांना ब्रिटिशकालीन समाजसुधारकांनी आणि नंतर राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार, महात्मा गांधी अशा समाजप्रबोधनकारांनी आव्हान दिले. त्यांनी विज्ञानाधारित विचारसरणी, शिक्षण आणि समानतेचा पुरस्कार करून समाजात विवेकवाद रुजवला.

तथापि, आधुनिक भारतात अंधश्रद्धा संपलेली नाही; ती नव्या स्वरूपात जिवंत आहे. आज अंधश्रद्धा बाजारपेठेतून विकली जाते. तंत्र-मंत्र, ग्रहदोष, वास्तुशास्त्र, अंकशास्त्र, ऑनलाइन भविष्यवाणी, चमत्कार विक्री हे त्याचे आधुनिक रूप आहे. या नव्या अंधश्रद्धा शिक्षित वर्गालाही जखडतात, कारण त्या भीती आणि असुरक्षिततेवर पोसल्या जातात. समाजशास्त्रीय विश्लेषणानुसार अंधश्रद्धा टिकते कारण ती समाजातील सत्ता-संबंधांना पूरक ठरते. धर्म, जात आणि लिंग या रचनेतून मिळणाऱ्या सत्तेचा लाभ घेणारे घटक अंधश्रद्धेचे पोषण करतात. ''दैवी इच्छा'', ''कर्मफळ'', ''ग्रहदोष'' अशा संकल्पनांद्वारे लोकांना विद्यमान असमानतेला नैसर्गिक मान्यतेचे रूप दिले जाते. गरीब माणूस आपल्या दारिद्र्याला देवाची शिक्षा मानतो, स्त्री आपली दुय्यम स्थिती ''कर्माचा परिणाम'' मानते, आणि अशा प्रकारे अंधश्रद्धा विषमता टिकवते.



सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, परंपरा आणि अंधश्रद्धा यांचा घनिष्ट संबंध आहे. परंपरा सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असली, तरी जेव्हा ती प्रश्न विचारण्यास नकार देते, तेव्हा ती अंधश्रद्धेत रूपांतरित होते. परंपरा व्यक्तीला सांत्वन देते, पण जेव्हा ती विवेकावर पडदा टाकते, तेव्हा सामाजिक प्रगती थांबते. भारतीय समाजात अनेक पारंपरिक विधी आणि सण सामाजिक संबंध दृढ करतात, पण त्याचबरोबर काही रूढी आरोग्य, शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य आणि सामाजिक निर्णयक्षमतेवर मर्यादा घालतात. या रूढींच्या व्यावसायिकीकरणामुळे अंधश्रद्धा आज उद्योग बनली आहे, चमत्कार विक्री, पूजा-पाठांचे पॅकेज, शुभरंग, वास्तु उपाय, रत्नधारण या साऱ्यांनी विवेकाचा व्यापार सुरू केला आहे. म्हणूनच बदलाचा मार्ग म्हणजे परंपरेचा नकार नव्हे, तर तिचे तर्कसंगत पुनर्निर्देशन होय.

अंधश्रद्धेचे आर्थिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहे. समाजातील गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्यसेवेची अनुपलब्धता या सर्व गोष्टी अंधश्रद्धेला खतपाणी घालतात. असुरक्षिततेच्या काळात व्यक्तीला आपले प्रश्न ''दैवी कारणां''तच उत्तर दिसते. ग्रामीण भारतात अजूनही आजारपणाला देवदंड मानले जाते, आणि झाडफ ुक, बळी, तांत्रिक विधी अशा अवैज्ञानिक उपचारांचा अवलंब केला जातो. या परिस्थितीत तांत्रिक, ज्योतिषी आणि ढोंगी बाबांचा उदय होतो, जे लोकांच्या भीतीचा व्यापार करतात. त्यामुळे अंधश्रद्धा ही केवळ श्रद्धा नसून आर्थिक शोषणाचे साधन बनते. सामाजिक विषमतेत ती सत्ताधारी घटकांना आपला अधिकार टिकवून ठेवण्यासाठी एक वैध साधन पुरवते.

अंधश्रद्धेचा स्त्रियांच्या जीवनावर विशेषतः भयावह परिणाम होतो. अनेक समाजांमध्ये महिलांना ''डायन'', ''मंगळिक'', ''अपशकुनी'' अशा लेबलांनी ओळखले जाते. अशा महिलांवर सामाजिक बहिष्कार, अत्याचार, मालमत्तेतील हक्क नाकारणे आणि आरोग्यसेवेपासून दूर ठेवणे ही सामान्य बाब आहे. पियर बोरद्यूच्या 'प्रतिकात्मक हिंसाचार' या संकल्पनेनुसार, अशा अंधश्रद्धात्मक आरोपांद्वारे समाज स्त्रियांचे स्वायत्त अस्तित्व नियंत्रित करतो. ही हिंसा नेहमी शारीरिक नसते; ती मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपात होते. म्हणूनच अंधश्रद्धेविरुद्धच्या लढ्यात स्त्रीशिक्षण, आरोग्यसेवा, आर्थिक स्वावलंबन आणि समुदायस्तरीय संवाद ही महत्त्वाची साधने आहेत.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी विज्ञान आणि तर्कशक्ती हाच सर्वात प्रभावी पर्याय आहे. विज्ञान माणसाला प्रश्न विचारायला शिकवते, निरीक्षणाद्वारे सत्य तपासायला प्रवृत्त करते. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी ''तुम्ही मानायला मोकळे आहात, पण तपासायला विसरू नका'' हा अत्यंत क्रांतिकारी संदेश दिला, जो विवेकवादाच्या चळवळीचा पाया ठरला. त्यांच्या या विचारसरणीने धार्मिक आंधळेपणा, तंत्र-मंत्र आणि ग्रहदोष यांसारख्या गैरवैज्ञानिक समजुतींना थेट सामाजिक आव्हान दिले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१(अ)() मध्येही प्रत्येक नागरिकाने ''वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि सुधारक वृत्ती'' जोपासावी, असे स्पष्टपणे नमूद आहे. महाराष्ट्रातील ''अंधश्रद्धा निर्मूलन आणि काळी जादू प्रतिबंध कायदा, २०१३'' हा याच दिशेने उचललेला ऐतिहासिक पाऊल ठरला आहे.

शिक्षण आणि माध्यमे ही अंधश्रद्धा निर्मूलनाची दोन अत्यावश्यक स्तंभ आहेत. शालेय शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशक्ती आणि विवेकवाद यांचा समावेश करणे आवश्यक आहे. माध्यमांनी देखील लोकजागृतीची जबाबदारी ओळखली पाहिजे. दुर्दैवाने, काही माध्यमे अंधश्रद्धेला बळ देतात, भविष्य सांगणारे कार्यक्रम, ज्योतिष सल्ले, आणि चमत्कारांचे प्रक्षेपण समाजाच्या विवेकाला भ्रमित करतात. उलट, विज्ञानाधारित माहितीपट, विवेकवादी चर्चा आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम समाजातील बौद्धिक वातावरण समृद्ध करू शकतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ व्यक्तीगत नव्हे तर सामूहिक प्रक्रियाही आहे. समाजातील बदल सामूहिक चेतनेवर अवलंबून असतो. म्हणून ग्रामपंचायतींपासून विद्यापीठापर्यंत ''विवेक मंच'', विज्ञान मेळावे, लोकशिक्षण आणि चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी शासन, शिक्षणसंस्था, स्वयंसेवी संस्था, आणि सामान्य नागरिक यांचा सहभाग अत्यावश्यक आहे.

अंधश्रद्धा ही समाजाच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठा अडथळा आहे. ती व्यक्तीची विचारशक्ती कुंठित करते आणि समाजाला स्थैर्याऐवजी अस्थिरता आणते. समाजशास्त्रीय, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ मोहीम नाही, तर ती सामाजिक क्रांती आहे. शिक्षण, विज्ञान, तर्कशक्ती आणि विवेक या चार आधारस्तंभांवरच समाजाचा प्रकाशमान भविष्यकाळ उभा राहू शकतो. अंध:कारावर प्रकाशाचा विजय तेव्हाच खरा ठरेल, जेव्हा प्रत्येक मनात विवेकाचा दिवा पेटेल आणि हा दिवा ज्ञानाचा, विज्ञानाचा आणि मानवतावादाचा असेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२,**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### कोडीन सिरप विक्री करणाऱ्यांची धिंड; पोलिसांकडून जनजागृती मोहीम



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शहर नशामुक्त करण्याच्या अभियानाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाने कोडीन सिरपची अवैध विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करून तब्बल १८ हजार ३६० बाटल्या, एकूण ७७ लाखांहून अधिक रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला होता. या प्रकरणातील आरोपी कल्पेश अग्रवाल आणि सय्यद नबी सय्यद लाल यांची आज रोशन गेट आणि कटकट गेट परिसरात धिंड काढण्यात आली. अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या प्रमुख गीता बागवडे यांनी जनतेत जागरूकता निर्माण करत, शहर नशामुक्त करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

### पंढरपुरात दिपोत्सवाने दिवाळीची प्रकाशमय सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** दिवाळीच्या निमित्ताने धनत्रयोदशी दिवशी पंढरपूरच्या चंद्रभागेचा महाद्वार घाट लक्ष लक्ष दिव्यांनी उजळुन निघाला. प्रतिवर्षी प्रमाणे धनत्रयोदशी दिवशी पंढरपुरात दीपोत्सव साजरा करून दिवाळीचा शुभारंभ केला जातो. त्यानुसार यंदाही महाद्वार घाटावर हजारो दिवे लावून दीपावलीची प्रकाशमय सुरुवात करण्यात आली. बडवे - उत्पात सेवाधारी यांच्या वतीने ॲड. आशुतोष बडवे पाटील यांच्या माध्यमातून हा दिपोत्सव साजरा होत असतो. या दीपोत्सवास पंढरपूरकर नागरिकांसह वारकरी भक्तांनी देखील सहभाग घेऊन चंद्रभागेच्या किनारी दिवे लावले. त्यामुळे सायंकाळी दिव्यांच्या प्रकाशात संपूर्ण महाद्वार घाटाचा परिसर उजळून निघाला होता.

### शेतकऱ्याला मूर्खात काढले तर सरकारला भोगावे लागेल - बच्चू कडू




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** शेतकऱ्याची दिवाळी अंधारात जाऊ देणार नाही, अशा बऱ्याच गोष्टी मी ऐकत असतो. पण शेतकऱ्यांच आयुष्यचं अंधारात आहे. दिवाळीचा काय विषय आहे. ५ - ६ हजार ऐकर दिल्यावर दिवाळी कशी साजरी होईल. सोयाबीनचे खरेदी केंद्र महाराष्ट्रात कुठच सुरु केले नाही. मध्यप्रदेश, छतीसगड येथे खरेदी केंद्र सुरु झाले, महाराष्ट्रात का नाही? दिवाळीच्या २१ ते २२ तारखे पर्यंत खरेदी केंद्र सुरु नाही झाले, तर जिल्हाधिकारी व पालकमंत्री याच्या गाड्या फोडु असा इशाराही माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिला.

### डोनाल्ड ट्रम्प आता पाकिस्तान-अफगाणिस्तानचा तंटा सोडवणार; म्हणाले, नोबेल दिलं नाही तरी

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे आंतरराष्ट्रीय स्तरावर तंटा मुक्ती अध्यक्ष बनले आहेत की काय? अशी परिस्थिती दिसत आहे. आपण आतापर्यंत आठ युद्धे थांबवली असल्याचा उल्लेख त्यांनी पुन्हा एकदा केला आहे. तसेच पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात सुरू झालेला सशस्त्र संघर्ष आपण चुटकीसरशी थांबवू शकतो, असा दावा त्यांनी केला आहे. हा संघर्ष थांबवून ते जगातील नववे युद्ध थांबवू शकतात, असेही ते म्हणाले आहेत.

व्हाईट हाऊसमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत ट्रम्प यांनी पत्रकारांनी पाकिस्तानच्या अफगाणिस्तानवरील ताज्या हल्ल्यांबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना ते म्हणाले, ''पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हल्ले केले आहेत, हे मला समजले. हा संघर्ष सोडविणे माझ्यासाठी अतिशय सोपे काम आहे. मला अमेरिकेचा कारभार हाकायचा आहे. दरम्यान जगात चाललेली युद्ध थांबवायलाही मला आवडतात.'' डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान सशस्त्र संघर्ष सोडवल्याचा दावा केला. दोन अण्वस्त्रधारी देशांच्या संघर्षात मध्यस्थी करून मी शांतता प्रस्थापित केली, याचा उल्लेख ट्रम्प यांनी पुन्हा एकदा केला आहे.

# दादा, कुत्री उड्या मारतात, डिवायडर मोठे करा, तक्रार ऐकून अजित पवारांनी डोक्यावर हात मारलां, आजपर्यंतचं सर्वात धमाल भाषण

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** सरकारी विकासकामे करताना कॉन्ट्रॅक्टर चांगला असेल तर काम चांगले होते. जर कॉन्ट्रॅक्टर खराब असेल तर सरकारला पण त्रास होतो, अनेक कामं रेंगाळत राहतात. त्यामुळे ज्याला राजकारण करायचंय त्याने कॉन्ट्रॅक्टर बनू नका अन् ज्यांना कॉन्ट्रॅक्टर व्हायचंय त्याने राजकारणात येऊ नका, हा माझा कटाक्ष असतो, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. ते शनिवारी फलटण येथील एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी अजित पवार यांनी त्यांच्या खास शैलीत भाषण करुन हशा पिकवला. यावेळी स्थानिक गावकऱ्यांच्या काही मागण्या ऐकून अजित पवार यांनी डोक्यावर हात मारुन घेतला.

यावेळी काही ग्रामस्थांनी गावातील वादांचा मुद्दा उपस्थित केला. ग्रामपंचायतीकडून विरोधकांची अडवणूक केली जाते, अशी तक्रार त्यांनी अजितदादांकडे केली. यावेळी अजित पवार यांनी म्हटले की, ग्रामपंचायतीमधील लोक तुम्ही निवडून दिले आहेत. विकासकामांसाठी पैसे देणे माझे काम आहे. गावातील वाद हे थोरामोठ्यांनी एकत्र बसून आणि चर्चा करुन इथल्या लोकांनीच सोडवले पाहिजेत. ग्रामपंचायत निवडणुकीत मी तुम्हाला अमुकतमुक माणसाला निवडून आणायला बटन दाबायला सांगितले होते का? आता पायताण घ्या आणि माझ्या डोक्यात टाका, असे अजित पवार यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

तुमच्या इथं कंपन्या आहेत त्यांचा टॅक्स जरा वाढवा. तुम्हाला फक्त २० लाख टॅक्स मिळतोय. तुमचा धंदापाणी नीट करा. गावात एकोपा ठेवा, जातीय सलोखा ठेवा, जातीय वादातून कोणाचं भलं झालं नाही. बारामती ग्रो तर फक्त साडेतीन लाख रुपये टॅक्स देते. वाढवा जरा, तेव्हाचा काळ वेगळा होता आताचा वेगळा आहे. डिस्टलरी मालकांना सांगा दादांनी आवाहन केलं आहे असे सांगा, असे अजित पवार यांनी सांगितले. तसेच आगामी काळात शेतीमध्ये एआयचा वापर करण्याची गरज अजित पवार यांनी व्यक्त केली. आमच्या शेतामधून आतापर्यंत ६०-७० टन उस निघायचा. एआयचा वापर करुन तेच उत्पादन आता १०० टनापर्यंत जाईल. आर्टिफिशियल इंटेलिजन्ससाठी शेतकऱ्यांना वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटकडून १८ हजार रुपये दिले जात आहेत. मात्र, आगामी काळात हे पैसे कृषी विभाग कडून देण्याचा विचार सुरू आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.

अजित पवार यांच्या या भाषणावेळी अनेक मजेशीर प्रसंग पाहायला मिळाले. अजित पवार यांनी फलटणमधील विकासकामांच्या योगदानाचा उल्लेख करताना काही जणांची नावे घेतली. त्यावेळी समोरच्या प्रेक्षकांमधून एकजण उठला आणि त्याने तुम्ही साडेतीन वर्षे सरपंच राहिलेल्या व्यक्तीचे नाव घेतले नाही, अशी तक्रार केली. त्यावर अजित पवार म्हणाले की, मी इथं लोकांची नावं घ्यायला आलोय की काम करायला आलोय. मी कधी बायकोचं नाव घेतलं नाही. इथे मी उखाणे घ्यायला आलो आहे का? तुम्ही डोक्यावर पडलात का तुम्ही, असा सवाल अजित पवारांनी समोरच्या व्यक्तीला विचारला.



यानंतर अजित पवार यांनी बारामतीपर्यंत जाणारे रस्ते कसे चांगले केले आहेत, याचा उल्लेख केला. त्यावेळी एका माणसाने अजित पवारांना सूचना केली की, 'दादा रस्त्यावरील डिव्हायडर थोडे मोठे करा. कुत्री उडी मारुन गाडीसमोर येतात. त्यावेळी अजित पवार मिश्कीलपणे म्हणाले की, 'मी कुत्र्यांना सांगतो उडी मारु नका'. त्यांच्या या वक्तव्यावर हशा पिकला.अजित पवार निघत असताना एका व्यक्तीने म्हटले की, दादा आमच्या फलटणला पदरात घ्या. त्यावर अजित पवार म्हणाले, 'आता माझा पदर फाटलाय.' यानंतर अजित पवार यांनी फलटणमधील विकासकामांकडे लक्ष देण्याचे आश्र्वासनही दिले.

मुंबईत १९४ कोटीच्या मॉलचे काम सध्या सुरू आहे. महिलांनी ज्या वस्तू बनवलेल्या आहेत त्याची विक्री त्या ठिकाणी होणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात १५ कोटींचा मॉल बनवणार आहोत. तसेच तालुक्याच्या ठिकाणी देखील बनवणार आहे. मला आता इथं निधी मागितला तुमची तुम्हीच काम करून घ्या. या योजनेतून सगळीच काम होतील. त्या योजनेचा फायदा घ्या. आता मोटरसायकल असेल तरी त्याला घर दिले जाणार आहे. आतापर्यंत ४४ लाख घर आपण मंजूर केले आहेत. मागच्या आणि आताची धरून राज्य बँकेंना पूरग्रस्तांना दहा कोटी रुपये दिले. त्याचेच आमच्यावरती आरोप होत आहेत. आरोप करणारे करत असतात. पण त्या बँकेने दहा कोटी रुपये दिले, असे अजित पवार यांनी म्हटले.

## दांडपट्टूयागत बॅट फिरवली, ११ चौकार अनब षटकारांच्या म दतीने रिंकू सिंगचं रणजी ट्रॉफीत 'वादळी' शतक!

कानपूर : रणजी ट्रॉफी २०२५-२६ हंगामाला जोरदार सुरुवात झाली असून, उत्तर प्रदेशचा स्टार फलंदाज रिंकू सिंग याने आपल्या पहिल्याच सामन्यात धुमाकूळ घातला आहे. उत्तर प्रदेश विरुद्ध आंध्र या सामन्यात, आंध्रच्या संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना ४७० धावांचा मोठा डोंगर उभारला. या आव्हानात्मक धावसंख्येसमोर उत्तर प्रदेश संघाची सुरुवात खराब झाली, आणि संघ अडचणीत सापडला. नेमक्या अशा कठीण परिस्थितीत रिंकू सिंग मैदानात आला आणि त्याने वादळी खेळी करत दमदार शतक झळकावले. रिंकू सिंगने सहकारी फलंदाज विपराज निगम याच्यासोबत महत्त्वाची शतकी भागीदारी रचली. या भागीदारीमुळे उत्तर प्रदेशचा संघ पुन्हा एकदा सामन्यात जोरदार पुनरागमन करू शकला. रिंकू सिंगची ही खेळी उत्तर प्रदेशसाठी संजीवनी ठरली आहे.

कर्णधार करण शर्मा बाद झाल्यानंतर, रिंकू सिंग मैदानात उतरला, त्यावेळी उत्तर प्रदेश संघाची धावसंख्या १४६/३ अशी होती. यानंतर लगेचच आर्यन जुयाल (६६) आणि भारताच्या अंडर-१९ संघाचा माजी कर्णधार प्रियम गर्ग (१८) हे महत्त्वाचे फलंदाजही पॅव्हेलियनमध्ये परतले. १७८ धावांवर यूपीची अर्धी टीम माघारी परतल्याने संघ मोठ्या संकटात सापडला होता. अशा परिस्थितीत रिंकूने प्रथम अराध्य यादवसोबत (१७) सहाव्या विकेटसाठी ४८ धावांची भागीदारी करत डाव सावरला. अराध्य बाद झाल्यानंतर रिंकूला आयपीएल स्टार विपराज निगमची चांगली साथ मिळाली.

## पंजाबमध्ये अमृतसर-सहरसा गरीब रथ एक्सप्रेस ट्रेनला आग; प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात यश

**सरहिंद :** शनिवारी सकाळी अमृतसरहून सहरसा येथे जाणाऱ्या गरीब रथ एक्सप्रेसमध्ये आग लागली, मात्र वेळीच आग विझवल्यानं मोठी दुर्घटना टळली. प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती. एका डब्यातून धूर निघताना दिसताच, अंबालापासून अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या सरहिंद रेल्वे स्थानकाजवळ ट्रेन तत्काळ थांबवण्यात आली आणि प्रवाशांना बाहेर काढून इतर डब्यांमध्ये हलवण्यात आलं. सुदैवाने, कोणतीही दुखापत किंवा जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी ७:३० वाजता ही घटना घडली. आग लागल्याचे लक्षात येताच, अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई केली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षिततेसाठी बाधित डब्यातून इतर डब्यांमध्ये हलवले. आग आटोक्यात येईपर्यंत आग तीन डब्यांमध्ये पसरली होती. अधिक नुकसान टाळत, रेल्वे कर्मचाऱ्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांसह आग त्वरित विझवली. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याची पुष्टी अधिकाऱ्यांनी केली.''सरहिंद जंक्शनवर ट्रेन क्रमांक १२२०४ (अमृतसर-सहरसा गरीब रथ एक्सप्रेस) मध्ये आग लागल्याची घटना घडल्याची तक्रार करण्यात आली आहे. रेल्वे कर्मचारी आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई केली. परिस्थिती नियंत्रणात आहे आणि आतापर्यंत कोणतीही दुखापत झाल्याचे वृत्त नाही,'' असे अंबालाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

# देशाला प्राधान्य कसे द्यायचे हे अफगाणिस्तानकडून शिका, ठाकरे गटाची बीसीसीआय आणि केंद्र सरकारवर टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पाकिस्तानी लष्कराने केलेल्या हवाई हल्ल्यात अफगाणिस्तानच्या तीन क्रिकेटपटूंचा मृत्यू झाला आहे. यानंतर अफगाणिस्तानने पुढील महिन्यात होणाऱ्या पाकिस्तानविरुद्धच्या तिरंगी क्रिकेट मालिकेतून माघार घेतली आहे. अफगाणिस्तानच्या या निर्णयाचा दाखला देत शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी बीसीसीआय आणि केंद्र सरकारला खेळांपेक्षा देशाला कसे प्राधान्य द्यायचे याबाबत अफगाणिस्तानकडून शिकण्याचे आवाहन केले आहे.

२२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानविरोधात देशभरात संतापाचे वातावरण आहे. अशात गेल्या महिन्यात झालेल्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताने पाकिस्तानविरुद्ध खेळू नये, यासाठी शिवसेनेने (उद्धव ठाकरे) भूमिका घेतली होती. तरीही भारत आणि पाकिस्तानमध्ये या स्पर्धेत तीन सामने खेळले गेले. त्यावर शिवसेनेने (उद्धव ठाकरे) बीसीसीआय आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली होती.

अफगाणिस्तानच्या तीन स्थानिक क्रिकेटपटूंचा पाकिस्तानी हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर त्यांचा कर्णधार रशीद खानने एक्सवर एका पोस्टमध्ये पाकिस्तानवर टीका केली व अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाच्या पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेत सहभागी न होण्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला.रशीद खानच्या या पोस्टवर प्रतिक्रिया देताना खासदार प्रियांका चतुर्वेदी म्हणाल्या की, ''पाकिस्तानचे सत्ताधारी हे भ्याड लोकांचे एक टोळके आहे, जे निरपराध लोकांच्या रक्तावर जगते आणि सीमेवर सातत्याने मार खाते.



त्यांना लाज वाटली पाहिजे.''

त्या पुढे म्हणाल्या, ''अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाने पाकिस्तानबरोबरची मालिका रद्द केली हे पाहून आनंद वाटला. कदाचित बीसीसीआय आणि केंद्र सरकारने देशाला खेळापेक्षा कसे प्राधान्य द्यायचे, हे त्यांच्याकडून शिकायला हवे.''

अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार रशीद खानने या ''क्रूर'' हवाई हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. त्याने तिरंगी मालिकेतून माघार घेण्याच्या अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाच्या निर्णयाला पाठींबा दिला आहे.

रशीद खान आपल्या पोस्टमध्ये म्हणाला की, ''पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यात अनेक नागरिकांचे मृत्यू झाल्याने मी दु:खी आहे. या हल्लूयात महिला, मुले आणि जागतिक स्तरावर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या इच्छुक तरुण क्रिकेटपटूंचा मृत्यू झाला आहे.''

''निष्पाप जीव गमावल्याच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानविरुद्धच्या आगामी क्रिकेट सामन्यांमधून माघार घेण्याच्या एसीबीच्या निर्णयाला माझा पाठींबा आहे. या कठीण काळात मी आमच्या नागरिकांसोबत आहे, आपली राष्ट्रीय प्रतिष्ठा महत्त्वाची आहे'', असे रशीद खानने पुढे म्हटले आहे.

# मग मंत्रिमंडळात का राहता? भुजबळांचा जामीन कधीही रद्द होऊ शकतो; अंबादास दानवेंचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** बीडमध्ये ओबीसी समाजाचा मोठा मेळावा संपन्न झाला असून ओबीसी नेते आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. राज्य सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी थेट नाव घेत महायुतीमधील भाजप नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला. त्यामुळे, राजकीय वर्तुळात या टीकेचे, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांमधील वेगळेपणाचे पडसाद उमटू लागले आहेत. त्यावरुन, आता माजी विरोधीपक्षनेते आणि शिवसेना उबाठा पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी मंत्री भुजबळ यांना सवाल केला आहे. मंत्री मंडळाच्या निर्णयाला विरोध आहे तर मग मंत्रिमंडळात का रहावं, असा प्रश्न उपस्थित करत राजीनामा देण्याचं सूचवलं आहे. तसेच, भुजबळ हे जामिनावर बाहेर असून त्यांचा जामीन रद्द होऊ शकतो, असेही त्यांनी सूचवले.

महाराष्ट्रात जातीय वाद नाही झाला पाहिजे. आपल्याला समृद्ध परंपरा आहे, दोन्ही बाजूने विखारी वक्तव्य होऊ शकतात. तुमचा जर मंत्रिमंडळाच्या निर्णयाला विरोध आहे, तर मग मंत्रिमंडळात का रहाव? मंत्र्यांचा राग आहे तर मंत्रिमंडळात का राहाव? मंत्रिमंडळात राहून मंत्र्यांच्या निर्णयाला विरोध म्हणजे हा दुपट्टीपणा आहे. नेतृत्व करणाऱ्या लोकांचा एक राजकीय बुरखा समोर आला आहे, अशा शब्दात अंबादास दानवे यांनी नाव न घेता छगन भुजबळ यांच्या भूमिकेवर निशाणा साधला. तसेच, राजीनामा देण्यासंदर्भात त्यांना सूचवलं आहे.

छगन भुजबळ यांना राज्याच्या मंत्रिमंडळ निर्णयाचा तिटकारा आहे, तर मंत्रिमंडळात गेल नाही पाहिजे, तिकडे ढुंकूनही नाही पाहिलं पाहिजे. यामागे राज्य सरकार तर खेळ करत नाही का? असा प्रश्न उपस्थित होतो. राज्यातील नेतृत्व करणाऱ्या लोकांचा उद्देश दिसतो. कारण, सदन घोटाळ्याचे मोठे मोठे भाषण हे देवेंद्र फडणवीस यांनी केले, त्यांना जेलमध्ये भाजपने टाकले. याच भाजपच्या कृपेने ते जामिनावर आहेत. जामीन कधी ही रद्द होऊ शकतो, असेही अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाने नेमलेल्या समितीचे ते अध्यक्ष आहेत, त्यांच्या गाठीभेटी घेतल्या पाहिजे आणि प्रश्र्नांना उत्तरे द्यायला हवेत. विखे मनाने करतात असे काही नाही. विखे विखारी आहेत तर मग तुम्ही त्यांच्या मांडीला मांडी लावून का बसता ? असा सवालही दानवे यांनी उपस्थित केला आहे.

हे वेगवेगळ्या राजकीय क्षेत्रातील व्यक्ती आहेत, कोणत्या बाजूने मत व्यक्त केले. बाजूने की विरोधात हे माहित नाही, राजकीय पक्षाचे लोक दोन्ही बाजू





घेतात. राजकीय पक्ष एकांगी बाजू घेत नाही. विजय वड्डेटीवार आणि भुजबळ खांद्याला खांदा आणि आणि गळ्यात गळा घालून बोलत होते, त्यांना ते आता वाईट वाटत त्याला काय करणार ? असेही मेळाव्यातील युतीच्या अनुषंगाने दानवे यांनी म्हटलं. राज ठाकरे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी मत व्यक्त केले ते सत्य मत आहे. राज ठाकरे म्हणजे मनसे आणि त्यांच्याच कार्यक्रमाचे उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले, याचा अर्थ या राज्यात मराठीचा आवाज उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे उठवतात. मराठीचा आवाज बाकी कोण उचलतो?. राज ठाकरे आज उद्धव ठाकरे यांच्या एकत्रिकरणातून मागील काही दिवसांच्या भूमिकेपासून मराठी माणूस एकजुटीची भूमिका हळूहळू पुढे जात आहे. दिवाळीच्या सणाला मराठी अस्मिता उजळवून टाकणार, असे अंबादास दानवे यांनी म्हटले.

# ''रुग्ण सेवा हिच, ईश्वर सेवा'' मेहकर येथे आरोग्यरथाचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी मेहकर शहरात शिवसेना जनसंपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात केंद्रीय आयुष, आरोग्य-कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते एन सी डी आरोग्य तपासणी सुरक्षा रथ अंबुलेन्सचे लोकार्पण करण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत मागील चार महिन्यांत १०,००० नागरिकांची नेत्र व गैर-संसर्गजन्य आजारांची तपासणी पूर्ण करण्यात आली असून ३,२०० नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले आहेत. आता पुढील १५,००० नागरिकांपर्यंत तपासणीचा लाभ पोहोचवण्यासाठी हा आरोग्यरथ तालुक्यात फिरणार आहे.






या कार्यक्रमाला सभापती माधवराव जाधव, तालुका प्रमुख सुरेश वाळुकर, शहरप्रमुख जयचंद बाढीया, दिलीपबापू देशमुख, योगेश जाधव, निरज रायमुलकर तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी, शिवसेना-युवासेना पदाधिकारी, माजी नगरसेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले, की ''आरोग्य हीच खरी संपत्ती असून प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवणे हे आमचे कर्तव्य आहे.''

हा आरोग्यरथ उपक्रम मेहकर तालुक्यात आरोग्य जागृती व सेवा पोहोचविण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. या आरोग्य तपासणी मध्ये नागरिकांनी सहभागी होऊन आपली तपासणी करून घ्यावी असा आवाहन त्यांनी यावेळी केले ..

## विविध वृत्त...

### बुलढाण्यात डिफेंडर कार वरुन महायुती मध्ये वॉर, संजय गायकवाड यांनी दिले स्पष्टीकरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाण्यात भाजप आणि शिवसेनेमध्ये चांगलीच वादाची ठिणगी पडली आहे. गेल्या काही दिवसांपासून आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. तर आता डिफेंडर कार वरून वार पाहायला मिळत आहेत. बुलढाण्यात काल दीड कोटी रुपयांची डिफेंडर कार आली आहे, जी एका कंत्राटदाराच्या नावावर आहे, याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी केली आहे. त्यांचा रोख हा नाव न घेता आमदार संजय गायकवाड यांच्याकडे होता. त्यावर आता आमदार संजय गायकवाड यांनी स्पष्टीकरण दिले आहे. ज्या गाडीची चर्चा होत आहे ती गाडी निलेश ढवळे या कंत्राटदाराची आहे, तो माझा नातेवाईक आहे आणि पक्षाचा कार्यकर्ता ही आहे. त्याने शंभर टक्के कर्ज काढून ती गाडी घेतलेली आहे. मी काही दिवस वापरण्यासाठी ती गाडी माझ्याकडे बोलावली आहे. माझ्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या गाडीवर आमदाराचा सिम्बॉल लावला आहे. त्यात काही गैर नाही आणि ज्यांनी कमिशन म्हणून आरोप केले त्या कुत्र्यांना मला उत्तर द्यायची गरज नाही, असं आमदार संजय गायकवाड यांनी म्हटलं आहे.





### सौर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याचे टॉवरवर चढून आंदोलन; प्रशासनाकडून कुठलीही दखल नाही



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** मेथी परिसरातील सुरू असलेल्या सौर प्रकल्पाबाबत मागील काही दिवसांपासून शेतकरी आक्रमक भूमिकेत आहेत. शेतकऱ्यांना योग्य मोबदला व अनुग्रह अनुदान देण्यात यावे, यासाठी सुरू असलेल्या वाटाघाटी निष्फळ ठरल्यानंतर बुधवारी सकाळी सात वाजता प्रकल्पग्रस्त शेतकरी ज्ञानेश्वर भुरे सिंग गिरासे यांनी प्रकल्पातील टॉवरवर चढून आंदोलन सुरू केले. शेतकऱ्यांची मागणी आहे की, या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना किमान दोन लाख रुपये एकरी अनुग्रह अनुदान देण्यात यावे. मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. ''जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत खाली उतरणार नाही,'' असा निर्धार गिरासे यांनी घेतला आहे.

## अखेर निकाल लागला! बुलढाणा एसपी प्रकरणात तांबे कायम, कॅटने पानसरे यांची याचिका बाद केली

धनत्रयोदशीपूर्वी तांबेंना दिलासा; पाच महिन्यांच्या वादाला पूर्णविराम, अ‍ॅड. डॉ. विनय मसूरकर यांची निर्णायक भूमिका

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील पोलिस अधीक्षकपदावरील वादाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. माजी जिल्हा पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांनी दाखल केलेली बदलीविरोधातील याचिका केंद्रीय प्रशासनिक न्यायाधिकरणाने (कॅट) फेटाळून लावत नीलेश तांबे यांची एसपीपदावर कायम नियुक्ती बहाल केली आहे. धनत्रयोदशीच्या पूर्वसंध्येला हा निकाल लागल्याने तांबेंना मोठा दिलासा मिळाला आहे. पानसरे यांनी अमरावती एसआरपीएफ गट क्र. ९ येथे झालेल्या बदलीविरोधात कॅटमध्ये धाव घेतली होती. तब्बल आठ ते नऊ सुनावण्यांनंतर अखेर १७ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारास कॅटने निकाल जाहीर करत प्रकरण बाद केले.





या संपूर्ण लढाईत राज्य शासनाच्या गृह विभागाचे विशेष सरकारी वकील व कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. डॉ. विनय मसूरकर यांनी शासनाची बाजू ताकदीने मांडत महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. तसेच नीलेश तांबे यांच्या बाजूने अ‍ॅड. राज पुरोहित यांनी काम पाहिले. पाच महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणावर आता पडदा पडल्याने बुलढाणा जिल्ह्यातील पोलिस प्रशासनात स्थैर्य येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तांबे धनत्रयोदशीपासून जिल्ह्यात नवी इनिंग सुरू करणार असल्याचे समजते.

## डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचनाने साजरा



दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन विशेष वाचन कार्यक्रमाद्वारे उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनातील प्रेरक कहाण्या व पुस्तके वाचून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे सर, यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले आणि त्यांना प्रेरणा दिली की ज्ञान आणि अभ्यासामुळेच यशस्वी जीवन घडवता येते.

शिक्षक मंडळातील सन्माननीय वानखेडे सर, गीते सर, मेटांगळे सर, जायभाये गायकवाड सर, खुशालराव मेटांगळे सर, विजय दाभाडे तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष मेहनत घेतली.

विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाद्वारे फक्त पुस्तके वाचली नाहीत, तर डॉ. कलाम यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन स्वतःच्या शिक्षणात आणि व्यक्तिमत्त्व विकासात उत्कृष्टता साधण्याचा संकल्पही व्यक्त केला.

शाळेच्या वाचन कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आणि नैतिक मूल्यांची रुजवात झाली, तर डॉ. कलाम यांच्या कार्याचे स्मरण ठेवण्याचा संदेश दिला गेला.

## एकनाथ शिंदेंच्या आमदाराची घोषणा, 'या' जिल्ह्यात स्वबळावर लढणार

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना हिंगोली जिल्ह्यात स्वबळावर लढवणार आहे. एकनाथ शिंदे यांनी सांगितला आहे की जिथे युती शक्य आहे तिथे युती करा, अन्यथा स्वबळाची तयारी करा आणि त्यानुसार आम्ही कार्यकर्त्यांना सूचना दिल्या आहेत. अशी माहिती शिंदेंच्या शिवसेनेचे कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांनी दिली आहे. युती जर केली तर कार्यकर्त्यांवर अन्याय होत असतो. सर्व कार्यकर्त्यांना न्याय मिळावा यासाठी शिवसेना स्वबळावर निवडणुका लढणार आहे. असेही ते म्हणाले.

मैत्रीपूर्ण लढत देणार आहोत. त्यात राष्ट्रवादी शिवसेना आणि भाजप युतीने पक्षातील कार्यकर्त्यांना वाटतं की आम्हाला उमेदवारी मिळाव. परंतु ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे. कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडू नये, कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना निवडून आणण्याचे काम सर्व नेत्यांनी करावं, असेही आमदार संतोष बांगर म्हणाले. हिंगोली नगरपालिका पूर्वी भाजपकडे होती. आता या नगरपालिकेत शिवसेना स्वबळावर लढणार असून धनुष्यबाणाचा नगराध्यक्ष आणि नगरसेवक नगरपालिकेमध्ये असतील. हिंगोली कळमनुरी आणि वसमत या तीनही नगरपालिकेमध्ये हीच परिस्थिती असेल. ज्या ज्या ठिकाणी युती होत असेल तिथे युती करा, जिथे युती होत नसेल तिथे मैत्रीपूर्ण लढत द्या. कुणावरही टीका करायची नाही. आपण आपलं काम दाखवायचं आणि पक्षाचं वर्चस्व दाखवून द्यायचं, असा निर्धार संतोष बांगर यांनी यावेळी केला आहे.



जळगावच्या पाचोरा, भडगाव मतदारसंघात महायुतीत मिठाचा खडा पडल्याचे बघायला मिळाले आहे. शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत स्वबळाचा नारा दिल्यानंतर, भाजपनेही आता स्वबळाचा नारा दिला आहे. त्यामुळे पाचोरा, भडगाव मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता शिवसेना आणि भाजप स्वबळावर लढणार असल्याचे चित्र आहे. त्यापाठोपाठ आता हिंगोलीतही शिंदेच्या शिवसेनाच स्वबळावरचा नारा दिला असून याबाबत आमदार संतोष बांगर यांनी माहिती दिली आहे.

## उपसरपंचांना नादाला लावून आयुष्यातून उठवणाऱ्या पूजा गायकवाडला कोर्टाचा झटका, जामीन अर्ज फेटाळला

**बीड/प्रतिनिधी :** प्रेमाच्या जाळ्यात ओढून नंतर अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याने बीड येथील लुखामसला गावचे उपसरपंच गोविंद जगन्नाथ बर्गे यांनी आत्महत्या केली होती. याप्रकरणातील आरोपी नर्तकी पूजा गायकवाड हिचा जामिनाचा अर्ज जिल्हासत्र न्यायाधीश व्ही. एस.मलकलपत्ते-रेड्डी यांनी फेटाळून लावला. पूजा गायकवाड हिच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. न्यायालयाने जामीन फेटाळल्याने आता नजीकच्या काळात तुरुंगाबाहेर येण्याच्या पूजा गायकवाड हिच्या अपेक्षांना या निर्णयामुळे सुरुंग लागला आहे.

पूजा गायकवाड हिने बंगला आणि पाच एकर जमीन नावावर कर म्हणून मानसिक त्रास दिल्याने गोविंद बर्गे यांनी सप्टेंबर महिन्यात स्वत:च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली होती. पूजा गायकवाड हिला जामीन मिळाल्यास समाजात चुकीचा संदेश जाईल. याशिवाय अशा महिलांकडून इतर पुरुषांचा आर्थिक, मानसिक आणि शारीरिक छळ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असा युक्तिवाद जिल्हा सरकारी वकील डॉ. प्रदीपसिंग राजपूत यांनी केला.

## विष्णू गायकवाड यांचा जिल्हा शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मान

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महार चिकना :** माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त गर्दे वाचनालय सभागृह, बुलढाणा येथे आयोजित भव्य कार्यक्रमात जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, कारेगाव येथील उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री. विष्णू भगवान गायकवाड यांना ''जिल्हा शिक्षक गौरव पुरस्कार'' देऊन सन्मानित करण्यात आले.

हा सन्मान मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गुलाबराव खरात यांच्या शुभहस्ते सपत्नीक प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास माननीय आमदार संजयभाऊ गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, शिक्षणाधिकारी विकास पाटील, तसेच विविध विभाग प्रमुख आणि गटशिक्षणाधिकारी श्री. कुंभारे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.




विशेष म्हणजे, श्री. विष्णू गायकवाड हे राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री. भगवानराव गायकवाड यांचे सुपुत्र असून, या गौरवाने शैक्षणिक परंपरेचा वारसा अधिक उजळला आहे. या प्रसंगी गटविकास अधिकारी देशमुख, रवी मापारी, बी.आर.सी. लोणार येथील कर्मचारी, तसेच परिवारातील सदस्य, शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, सरपंच विश्वास केंधळे, शिवाजीराव ढाकणे, आणि कारेगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. गायकवाड यांच्या या सन्मानाबद्दल शिक्षक बांधव, मित्रपरिवार आणि सर्व समाजबांधवांनी हार्दिक अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. गौरव शिक्षकाचा अभिमान कारेगावचा!''